**पीएच.डी. संशोधन आराखडा**

# "शिवकालीन मराठी संत साहित्यातील मनाविषयीचे चिंतन: एक अभ्यास"

## (विशेष संदर्भ - संत तुकाराम आणि समर्थ रामदास)

मानव्यविद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.(विद्यावाचस्पती)
या पदवीकरीता

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यास शोध प्रबंधाचा आराखडा सादर


**संशोधक**

**सरकाळे शिवमाला रामराव**

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ. म. ई. तंगावार**

मराठी विभाग
श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर
जि.लातूर (महाराष्ट्र)

**: संशोधन केंद्र :**

**श्री हावगीस्वामी महाविद्यालय, उदगीर जि. लातूर**


**मे - २०१९**

# "शिवकालीन मराठी संत साहित्यातील मनाविषयीचे चिंतन : एक अभ्यास" (विशेष संदर्भ - संत तुकाराम आणि समर्थ रामदास)

**प्रस्तावना**

शिवकाळ हा मराठी साहित्याच्या दृष्टीने अतिशय समृद्ध आहे. अभंग वाङ्मय, बखर वाङ्मय व शाहिरी वाङ्मयाची निर्मिती शिवकाळात झाली. वारकरी संप्रदायातील लोकप्रिय कवी संत तुकारामांनी याच काळात अभंगाची निर्मिती केली. समर्थ संप्रदायातील समर्थ रामदासांनी मोठ्या प्रमाणात साहित्याचे लेखन प्रस्तुत काळात केले. एकंदरीत मराठी साहित्यात मौलिक स्वरूपाचे भर घालणारे अनेक कवी व ग्रंथकार शिवकाळात होऊन गेले. सर्वसाधारणपणे इ.स. १६०० ते इ.स. १७०० दरम्यानचा काळ हा शिवकाळ म्हणून ओळखला जातो.

मध्ययुगीन मराठी वाङ्मयातील प्रबोधनात्मक साहित्य म्हणजे संत साहित्य होय. संतांनी ओवी, अभंग व श्लोकांच्या माध्यमातून प्रबोधनाची भूमिका पार पाडली. संत साहित्य आणि तत्कालीन परिस्थिती, संत साहित्य आणि समाज, सत साहित्य आणि विचार याचा परस्पर असा संबंध आहे. भक्ती हे मूल्य संत साहित्याच्या केंद्रस्थानी असले तरी संतांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून अंधश्रद्धा व जाती निर्मूलनाचे काम प्रभावीपणे केले. त्यामुळे इतक्या वर्षांनंतरही संतांची म्हणजेच त्यांच्या साहित्याची लोकप्रियता कमी झाली नाही. संतांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून अनेक विषय हाताळले. मानवी मनाविषयी संतांचे निरीक्षण सूक्ष्म स्वरूपाचे होते. आजच्या विज्ञानयुगात, संगणकीय युगात व धावपळीच्या युगात स्थिर मन पहावयास मिळत नाही. त्यामुळे अशा काळात मनाच्या एकाग्रतेसाठी तसेच मानवतावादी मूल्य रुजविण्यासाठी संत साहित्यातील विचार समजावून घेणे प्रासंगिक वाटते.

शिवकाळात विविध संप्रदायातील अनेक संत होऊन गेले असले तरी मराठी साहित्यात संत तुकाराम व समर्थ रामदास यांचे साहित्य हे अक्षर साहित्य ठरले आहे. मानवी मनाविषयी या दोन्ही संतांनी विविध अंगाने चिंतन केले. शिवपूर्व काळातही संत ज्ञानेश्वर व संत एकनाथ या वारकरी संप्रदायातील संतांनी मनाविषयी जागोजागी साहित्यातून भाष्य केले. 'मन करा रे

प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण', 'मनाच्या तळमळे। चंदनेही अंगा पोळे', 'तुका म्हणे मवा पाहिजे अंकुश' यासारखे अनेक चरण तुकोबांच्या अभंगात जागोजागी आढळून येतात. 'अंतरी अनुतापे तापले। तेणे अंतर शुद्ध जाले।', 'घात होतो दुश्चीतपणे।' यासारख्या अनेक ओळी समर्थ रामदासांच्या साहित्यात आलेल्या आहेत. मनाला पश्चाताप झाला की, खऱ्या अर्थाने अंतःकरण शुद्ध होते. मन दुषीत झाले की, कोणतेही कार्य चांगल्या प्रकारे होऊ शकत नाही, असे रामदासांचे चिंतन आहे.

**संशोधनाचे महत्त्व**

माणसाची वाटचाल सध्याच्या काळात अतिशय तीव्रपणे भौतिक सुखाकडे चालू आहे. जीवनमूल्य पायदळी तुडवून माणूस वाटेल त्या मार्गाने सैरावैर धावत सुटला आहे. माणसाच्या संवेदना बोथट होत चाललेल्या आहेत. विज्ञानामुळे जितकी प्रगती होत आहे तितकीच काही प्रमाणात मानवी मूल्यांची अधोगती होत आहे. विज्ञान तंत्रज्ञान हे एका अर्थाने दुधारी शस्त्र आहे. अशा या काळात माणसाची अवस्था 'धरलं तर चावतंय, सोडलं तर पळतय' अशी झाली आहे. यास अस्थिर मन हे कारणीभूत आहे. शिवकालीन संतांनी मनाच्या शुद्धतेविषयी, एकाग्रतेविषयी जे काही भाष्य केले ते एकविसाव्या शतकात प्रासंगिक आहे. संतांच्या या विचारामुळे समाजात शांतता नांदू शकते. समाजामध्ये एक प्रकारचा बदल होऊ शकतो. यासाठी प्रस्तुत विषयावर चिंतन करणे अधिक महत्त्वाचे आहे. मनाविषयीची समस्या ही महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून अखिल विश्वातील मानव जातीचा हा विषय आहे. अशा परिस्थितीत संतांनी मनाविषयी केलेल्या विवेचनाचे सूक्ष्मपणे अध्ययन करणे ही आजच्या काळाची खरी गरज आहे.

**संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा**

भारतातील विविध प्रदेशात त्या-त्या भाषेत संतांनी आपल्या साहित्यातून मनाविषयी लेखन केले. महाराष्ट्रातही तेराव्या शतकापासून विविध संप्रदायातील संतांनी मनाचे कंगोरे उलगडून दाखविले. एकंदरीत ही व्याप्ती अतिशय मोठी आहे. प्रस्तुत शोधप्रबंधात शिवकालीन मराठी संत साहित्याद्वारे मनाविषयी जे लेखन झाले आहे, त्याचाच विस्ताराने अभ्यास करावयाचा आहे. शिवकाळातील विविध संप्रदायातील संतांनी मानवी मनाविषयी केलेल्या

विवेचनासंदर्भात प्रस्तुत संशोधनात विचार करावयाचे असले तरी शिवपूर्वकालीन संत साहित्यातही हा विषय संतांनी हाताळलेला आहे. त्याचाही विचार संशोधनात केला जाणार आहे.

## उद्दिष्टे

'शिवकालीन मराठी संत साहित्यातील मनाविषयीचे चिंतन : एक अभ्यास'(विशेष संदर्भ - संत तुकाराम आणि समर्थ रामदास)

या विषयावर संशोधन करण्यासाठी पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१) शिवकालीन सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

२) शिवपूर्वकालीन मराठी संत साहित्यातील मानवी मनाचा शोध घेणे.

३) शिवकाळातील संत तुकारामांच्या अभंगातील मानवी मनाचे अध्ययन करणे.

४) समर्थ रामदासाच्या साहित्यातील मानवी मनाचा अभ्यास करणे.

५) शिवकालीन मराठी संतांनी मनाविषयी जे भाष्य केले त्याची प्रासंगिकता जाणून घेणे.

## गृहितके

प्रस्तुत विषयावर संशोधन करत असताना खालील गृहितके निश्चित करण्यात आली आहेत.

१) शिवकालपूर्व मराठी संत साहित्यातून मनाच्या विविध अवस्थांचे चित्रण केले आहे.

२) संत तुकारामांच्या अनेक अभंगात मनाविषयी विस्ताराने भाष्य आलेले आहे.

३) समर्थ रामदासांच्या 'मनाचे श्लोक' व 'दासबोध' याग्रंथातून मनाविषयीचे चिंतन आढळून येते.

४) वर्तमानकाळातील आव्हानांस संतांनी केलेले मनाविषयीचे चिंतन समर्पक आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी विश्लेषणात्मक व मानसशास्त्रीय संशोधन पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. तसेच तुलनात्मक संशोधन पद्धतीचा देखील वापर केला जाणार आहे. मनाविषयी संतांच्या साहित्यात जे काही संदर्भ आलेले आहेत, ज्याचे विवेचन करताना आस्वादात्मक संशोधन पद्धतीचा देखील अवलंब केला जाईल.

**प्रकरण मांडणी**

**प्रकरण पहिले - शिवकाळपूर्व मराठी संत साहित्य आणि मानवी मन**

शिवपूर्व काळात म्हणजेच यादवकाळ व बहामनी काळात महानुभाव, वारकरी, वीरशैव इत्यादी संप्रदाय महाराष्ट्रात उदयास आले. या संप्रदायातील संतांनी वैशिष्ट्यपूर्ण असे लेखन करून मराठी साहित्यात मोलाची भर घातली. या संतांच्या वाङ्मयामध्ये जे काही मनाविषयीचे चित्रण आले आहे, त्याचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल.

**प्रकरण दुसरे - मन : संकल्पना व स्वरूप**

मानवी मनाविषयी भारतीयअभ्यासकांबरोबरच पाश्चिमात्त्य अभ्यासकांनी काही संकल्पना सांगितल्या आहेत. त्याचे प्रकार व वेगळेपण यासंबंधी अभ्यासकांनी आपली मते मांडलेली आहेत. त्यासंबंधीचा विचार या प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे.

**प्रकरण तिसरे - शिवकालीन सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिस्थिती**

शिवकाळात विविध क्षेत्रातील परिस्थिती कशी होती याचा आढावा घेऊन शिवकालीन मराठीतील साहित्याचा धांडोळा सदरील प्रकरणात घेतला जाईल.

**प्रकरण चौथे - संत तुकारामांच्या अभंगातील मनाविषयी चिंतन**

संत तुकारामांचे अभंग आजही मराठी माणसाच्या मनात आहेत. तुकारामाइतका लोकप्रिय संत मराठी साहित्यात आढळून येत नाही. संत तुकारामांनी विविध विषयांवर विपुल प्रमाणात अभंग लिहून उपदेशकाची भूमिका पार पाडली. मानवी मनाविषयी संत तुकारामांनी आपल्या अभंगातून जे काही भाष्य केले आहे. त्याचा अभ्यास प्रासंगिकता लक्षात घेऊन सदरील प्रकरणात केला जाणार आहे.

**प्रकरण पाचवे - समर्थ रामदासांच्या साहित्यातील मनाविषयी चिंतन**

समर्थ रामदास हे समर्थ संप्रदायातील प्रमुख संत होत. त्यांच्या लेखनातही विषयाची विविधता आहे. मानवी मनाविषयी वेगवेगळ्या श्लोकातून, चरणांतून समर्थ रामदासांनी लेखन केले आहे. त्याचा आढावा या प्रकरणातून घेतला जाईल.

**प्रकरण सहावे - निष्कर्षात्मक समारोप**

'शिवकालीन मराठी संत साहित्यातील मनाविषयीचे चिंतन : एक अभ्यास'(विशेष संदर्भ - संत तुकाराम आणि समर्थ रामदास)

या विषयाच्या संदर्भात वरील प्रकरणांद्वारे जो अभ्यास केला जाणार आहे त्याआधारे निष्कर्ष काढून विस्ताराने निष्कर्षात्मक विश्लेषण सदरील प्रकरणात करण्यात येईल.

**संदर्भ ग्रंथ सूची**


१) संत साहित्याचा सामाजिक अन्वयार्थ-डॉ.शरदचंद्र देगलूरकर, प्रकाशक चंद्रशेखर महाराज देगलूरकर, शके १९२६

२) संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती - प्रा.गं.बा. सरदार, लोकवाङ्मयगृह, मुंबई, १९८२

३) सामाजिक संशोधन पद्धती - प्रदीप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७

४) सामाजिक संशोधन पद्धती - पु.ल. भांडारकर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८७

५) सार्थ अभंगगाथा - संजय शिवाजी काकडे, अमोल प्रकाशन, पुणे, २०१८

६) सार्थ मराठी श्लोक - वामन देशपांडे, मनोरमा प्रकाशन, मुंबई, २०११



मार्गदर्शक
**प्रा.डॉ. म. ई. तंगावार**
मराठी विभाग
श्री हावगीस्वामी महाविद्यालय,उदगीर

संशोधक
**सरकाळे शिवमाला रामराव**